आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १८२ वा ● गुरुवार दि. १९ डिसेंबर २०२४ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●




## झरोका

एक – अहो, लोकसभेत संविधानावर चर्चा होत असताना विविध पक्षाचे लोकप्रतिनिधी न्यायिक चर्चा करताना दिसतात. चर्चेच्या दरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गैरहजर असतात.केवळ स्वतःचे विचार व्यक्त करण्यासाठी संविधानावर त्यांनी भाष्य केले. परंतु महाराष्ट्रातील सत्ता बदलात फाटाफुटी बंडखोरी झाली, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशानी राज्य सरकार सह राज्यपाल विधानसभा अध्यक्षांना फटकारले त्यावेळी संविधानाचा विसर कसा पडला होता असा सवाल ठाकरे सेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी संविधानावर बोलताना पण पंतप्रधानांना सवाल केला त्याचे आश्र्चर्य वाटते काय कारण असावे हेच कळत नाही. डोकं बधिर झाला आहे.

दुसरा – अरे, नरेंद्र मोदी सरकारने आणि महाराष्ट्रात देवेंद्र फडणीस यांनी संविधानाच्या मूल्यांची धूळधाण उडविले त्यामुळे अरविंद सावंत यांनी संविधानाबद्दल जे काही बोलले ते योग्यच असावे त्यांना हिंदुत्ववादी म्हणून नाकारता येणार नाही, याची खबर घेतली पाहिजे.

एक – अहो, शिवसेनेचे खासदार म्हणून बोलत नाही, परंतु हिंदुत्ववादी धारणा असलेल्या शिवसेनेचे खासदार असो किंवा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह असो किंवा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी असो हे सारे हिंदुत्ववादी आहेत, परंतु सेना खासदार अरविंद सावंत यांनी आज घडीला संविधानाची गुणगान केल्यामुळे आश्र्चर्य वाटते म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे पक्ष कोणताही असो विचारधारणा कोणतीही असो परंतु लोकप्रतिनिधी म्हणून संविधानाचा सन्मान केलाच पाहिजे त्यानुसारच कार्यरत राहिले पाहिजे लोकशाहीच्या चौकटीतून मार्गक्रमण केले पाहिजे त्यामुळे अरविंद सावंत यांनी भारतीय राज्यघटनेबद्दल जे काही मत व्यक्त केले आहे ते उचितच असावे त्यात दुमत नाही, तो कशाला संशय घेतोस.

एक – अहो, मला त्यांच्याबद्दल संशय घ्यायचा नाही. भाजपा बंडखोर सेनेचे एकनाथ शिंदे यांच्या समतीनेच विधानसभा अध्यक्ष कार्यरत असताना संविधानाला बगल देऊन अपात्र आमदाराच्या प्रकरणात न्याय मिळाला नाही मग त्यावेळी संविधानाच्या माध्यमातून निर्णय का झाला नाही. मग आजच संविधान कसे काय आठवते म्हणून बोलले असेल त्याबद्दल संशय घेण्याची गरज काय, असे मला वाटते म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, संशय वगैरे नसतो त्याच्यात संविधानावर चर्चा असल्यामुळे सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आपापले मत व्यक्त करीत असतात, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे नेहमीसाठी भारताचे पहिले पंतप्रधान नेहरू आणि गांधी परिवारासह काँग्रेसवर टीका करीत असतात परंतु संविधानाच्या चर्चे दरम्यान संविधानाचा उदो उदो करीत पंडित नेहरू यांचे नाव आवश्यकपणे चर्चिले गेले ते वास्तव असले तरी आजवरच्या देशाला लपविण्यासाठी नेहरू संविधानाचे नाव घेत असतील त्यांच्यावर संशय घेणे ठीक परंतु खासदार अरविंद सावंत यांच्या विचारावर संशय घेणे चुकीचे वाटते यातून संविधानाने लोकप्रतिनिधी याबद्दल प्रत्येकाने आत्मपरीक्षण केले पाहिजे हे लक्षात ठेव.

एक – अहो, मागील चर्चेमध्ये खासदार प्रियंका गांधी, राहुल गांधी यांनी जे विधान केले त्या बरोबरीने हिंदुत्ववादी खासदार अरविंद सावंत यांनी स्पष्टपणे संविधानाची मत व्यक्त केले त्यामुळे संशयाला एक एक शब्द थांबू नका हो त्यामुळे संशय आला म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, तसे नव्हे हिंदुत्ववादी पक्षात कार्यरत असलेले अनेक लोकप्रतिनिधी लोकशाही संविधानाला मानणारे आहेत त्यामुळे अरविंद सावंत यांच्यासारख्यासह कोणावरही संशय घेता येत नाही कारण तत्कालीन पंतप्रधान हिंदुत्ववादी अटल बिहारी वाजपेयी किंवा लाल कृष्ण आडवाणी, राम जेठ मलानी आदींनी संविधानाचा सन्मान केलेलाच आहे. आज घडीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संधी साधू विचाराने लोकशाही संविधानाचा उदो उदो करीत असले तरी त्यांच्या ढोंगीपणा उघड पडतो मग फाटाफुटीच्या काळात किंवा पक्ष थोडीफोडीच्या संदर्भात संविधानाला बगल दिली असेल तर, आज ना उद्या न्याय मिळणारच आहे त्यासाठी तो कशाला काळजी करू करतो शांत बस.




# लातूरचे देशमुख बंधु लागले कामाला ?

लातूर (दैलाप्रप्र) : सत्ता असताना खुर्चीच्या नावावर गडीचे राखण केले आणि सत्ता गेल्यानंतर भाजपा, शिवसेनेच्या माध्यमातून काँग्रेस बरोबरीने सत्ताकारण करताना काका दिलीपराव देशमुख यांच्या आशीर्वादाने म्हणा किंवा मार्गदर्शनाखाली सहकार क्षेत्रात पाय रुजविण्याचा प्रयत्न केला आणि मराठवाड्यातील साखर कारखाने ताब्यात घेतली परंतु विधानसभा निवडणुकीत माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांना निसटता विजय मिळाला आणि आमदार धीरज देशमुख यांच्या दारुण पराभव झाला आणि अचानक लोकप्रतिनिधीचे काय काम असते यातील मर्म अचानक कळाल्यामुळे आज घडीला देशमुख बंधू येथील नागरी समस्यांच्या निवारण्यासाठी जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याच्या कार्यालयाकडे कामानिमित्ताने गाठीभेटी किंवा पत्राद्वारे सूचना देऊन एक प्रकारे मागणी करीत आहेतच की काय अशी कुजबूज होत असून सत्ता गेली तरी देशमुख बंधू कामाला लागले हे बरे झाले, होते आहे अशी कुजबूज लातूर शहरासह जिल्हाभरात होताना दिसते आहे.

लातूरसह लातूर जिल्ह्यातील नागरी समस्या, ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरावस्था महागाई, भ्रष्टाचाराने दुखावलेली जनता कामामुळे उपासमार होणारे कामगार, दलित वस्तीतील सुविधा, रोजगारांना रोजगार नाही, उपासमारीची वेळ, स्वस्त धान्य दुकानावर कुजका माल यातून रोगराई निर्माण होत होती परंतु माजी मंत्री आमदार अमित देशमुख हे लातूरची गडी ते मुंबई असा दौरा करीत आणि आमदार धीरज देशमुख हे ग्रामीण भागातील दौरे करून साखर कारखाने आणि जिल्हा बँकेत बसून देशमुखी थाट करीत होते. परंतु विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने जो काही झटका बसला त्यामुळे समाजकारण, राजकारण सत्ताकारण आणि लोक संपर्क म्हणजे काय हे कळाल्यामुळे अचानक जागृत होऊन आमदार अमित देशमुख आणि माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे चेअरमन धिरज देशमुख हे शहरी, ग्रामीण भागातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, अन्नधान्य पुरवठा करण्यासाठी, रस्ते दुरुस्ती करण्यासाठी, पाणीपुरवठा नियमित करण्यासाठी, प्रशासनाला सूचना करून सर्व समस्या विनाविलंब सोडाव्यात अशी मागणी करताना दिसतात त्यामुळे दिवंगत विलासराव देशमुख यांच्या नंतर देशमुख नावाचे कोणीतरी लोकप्रतिनिधी सर्वसामान्य जनतेसाठी रस्त्यावर नसले तरी शासकीय अधिकारी प्रशासनाला विनंती करून जनतेच्या प्रश्र्नासाठी तत्पर झाल्याने सर्वसामान्य जनतेत समाधान व्यक्त होत असले तरी देशमुख बंधू कसे काय कामाला लागले असेच प्रतिक्रिया सर्वसामान्य जनतेतून उटताना दिसत आहेत.

# जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवाराचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री बाबासाहेब पाटील यांना साकडे निवेदन सादर

लातूर : लातूर जिल्हा रूग्णालय हस्तांतरण निधी वर्ग करून त्वरित भूमिपूजन करावे असे साकडे घालून माझं लातूर परिवाराने उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री बाबासाहेब पाटील यांना निवेदन दिले. नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात हा बहुचर्चित प्रश्र्न मार्गी लावावा अशी विनंती देखील करण्यात आली आहे.



लातूर जिल्हा रुग्णालय उभारणीसाठी शासनाने जागा हस्तांतरण करण्यास मंजुरी दिलेली आहे. यासाठी लागणारा मोबदला रुपये ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास देण्याची तरतूद देखील केली आहे. मात्र अद्याप यासाठीचा निधी आरोग्य विभागाने कृषी विभागास वर्ग केलेला नाही. हा निधी त्वरीत वर्ग करून लातूरच्या प्रलंबित आणि मंजूर असलेल्या जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन करून लातूरकरांना उपकृत करावे अशी विनंती यावेळी शिष्टमंडळाने केली. हा निधी वर्ग करून ६० दिवसांच्या आत जिल्हा रूग्णालय हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाली पाहिजे असा शासन आदेश १९ जून २०२४ रोजी काढण्यात आला आहे. याची मुदत १९ ऑगस्ट २०२४ रोजी संपली आहे.

लातूर जिल्हा रूग्णालय व्हावे यासाठी माझं लातूर परिवाराने निर्णायक लढा दिला आहे. ऐतिहासिक साखळी उपोषण, मंत्रालयात जाऊन तत्कालीन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालक मंत्री यांना विनंती केली होती.

राज्याचे प्रमुख आणि संवेदनशील, जाणकार उपमुख्यमंत्री, मंत्री म्हणून आपण हा प्रश्र्न त्वरित मार्गी लागेल यासाठी त्वरीत निर्देश द्यावेत अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळात ड. बालाजी पांचाळ, विशाल विहिरे, प्रशांत पाटील, बबन भोसले या सदस्यांचा समावेश होता. निवेदनावर परिवारातील ३५ मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही वेळ शिष्टमंडळाने मागितली असून त्यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात येईल. तसेच हा प्रलंबित प्रश्र्न तात्काळ निकाली काढून भूमिपूजन करावे अशी आग्रही विनंती करणार असल्याचे ड.बालाजी पांचाळ यांनी सांगितले आहे.

# लातुरात दोन दिवसीय शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे आयोजन

लातूर : अभिजात फिल्म सोसायटी आणि दयानंद एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरमध्ये प्रथमच दोन दिवसीय स्पर्धारुपी शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे आयोजन दि. २३ आणि २४ डिसेंबर २०२४ रोजी दयानंद सभागृह येथे करण्यात आले आहे.

ABHIJAAT SHORT FILM FESTIVAL

या फेस्टिवलमध्ये शॉर्ट फिल्म, डॉक्युमेंटरी, निमेशन आणि व्हिडिओ साँग आदी प्रकारांचा समावेश असणार आहे. चित्रपटसृष्टीतील अतुलनीय योगदानास स्मरून व्ही. शांताराम यांच्या नावाने सर्वोत्कृष्ट शॉर्ट फिल्मला प्रथम पारितोषिक २१ हजार रुपये देण्यात येणार आहे. मिळणार आहे. द्वितीय आणि तृतीय पारितोषिक अनुक्रमे १५ आणि ११ हजार देण्यात येणार आहे. अभिजात फिल्म सोसायटी लातूरमध्ये मागील दोन दशकांपासून आशयघन सिनेमा प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्नशील आहे. मनोरंजनापलीकडे सिनेमाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा आणि अधिक सिनेसाक्षर समाज घडावा, या हेतूने विविध कार्यक्रम सोसायटी राबवत असून हा शॉर्ट फिल्म फेस्टिवल याच प्रक्रियेचा पुढचा टप्पा असल्याचे सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी सांगितले. हा लघुपट महोत्सव पूर्णपणे नि:शुल्क असून रसिक प्रेक्षकांनी या महोत्सवास भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजन व कृतीसमिती कडून करण्यात आले आहे. महाराष्ट्रातल्या एकंदर शिक्षणव्यवस्थेचे अतिशय कलात्मक चित्रण मुक्ता, शाळा सुटली आणि प्रश्र्न आदी लघुपटांतून बघायला मिळणार आहे. तर मिसिंग सिन्स १९५६, कॅनव्हास आणि नाम क्या है तुम्हारा ? सारख्या लघुपटांमधून सामाजिक असमतोलाचे प्रतिकात्मक चित्रण पाहायला मिळणार आहे. त्याचप्रमाणे मलर, खिचडी भात, सापशिडी, दारं आणि मिरग या लघुपटांच्या माध्यमातून स्त्री प्रश्र्नांकडे बघण्याचा पारंपारिक दृष्टीकोन भेदण्याचा प्रामाणिक प्रयत्न तरुण दिग्दर्शकांकडून झाला आहे. तामिळ , तेलगू, कन्नड आणि मल्याळम भाषेतील वैविध्यपूर्ण विषयांवरील लघुपटांचाही या महोत्सवात समावेश करण्यात आला आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या निमेशन आणि डॉक्युमेंटरीज सुद्धा या महोत्सवात पाहायला मिळणार असून स्थानिक फिल्ममेकर्सच्या कलाकृतींना सुद्धा विशेष स्थान देण्यात आले आहे. चित्रपटनिर्मितीच्या एकूण २० विभागात वेगवेगळी पारितोषिके देण्यात येणार असून या स्पर्धेसाठी राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक विनोद कांबळे आणि ज्येष्ठ चित्रपट समीक्षक संतोष पाठारे परीक्षक म्हणून काम पाहणार आहेत.

# महात्मा बसवेश्र्वरमध्ये भारतीय सैन्य दलातील शेख आरिफ मलिक यांचा सत्कार

लातूर : येथील महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात भारतीय स्थलसेनेत सिग्नल रेजिमेंटमध्ये कार्यरत असणारे शेख अरिफ मलिक यांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते ग्रंथ आणि लेखनी देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी स्टाफ सेक्रेटरी डॉ. रत्नाकर बेडगे, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.



शेख आरिफ मलिक हा महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असून बारावी कला शाखेतून शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये उत्तीर्ण झाला आहे. त्याने नुकतेच भारतीय स्थलसेनेचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे त्याचे मूळ गाव बोरवटी ता., जि. लातूर असून पुणे आणि गोवा येथे त्यांनी प्रशिक्षण पूर्ण करून सध्या त्यांची आसाम येथे नुकतीच पोस्टिंग झाली आहे.

त्यांनी मिळावलेल्या उज्वल यशाबद्दल श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा

लातूर, : अल्पसंख्यांक नागरीकांना त्यांची संस्कृती, भाषा,




धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे, तसेच याबाबतच्या वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी, यासाठी १८ डिसेंबर हा अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या अध्यक्षतेखाली लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, संदीप कुलकर्णी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक अरविंद कांबळे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अफसर शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, जिल्हा कौशल्य विकास, उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक बालाजी मरे यांच्यासह अल्पसंख्यांक समाजाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. अल्पसंख्यांक समाजासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध माध्यमातून जनजागृती करावी. तसेच पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही गतीने करावी, असे प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले. अल्पसंख्यांक विभागामार्फत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी यावेळी दिली. जिल्ह्यात प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात येणारी विविध विकास कामे, अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत गेल्या चार वर्षात मंजूर कामांची माहिती त्यांनी दिली. तसेच धार्मिक अल्पसंख्यांक खासगी शाळा पायाभूत सोयी सुविधा योजना व डॉ. झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजनेतून २०१८–१९ ते २०२४–२५ पर्यंतच्या योजनांचा तसेच अल्पसंख्यांकाच्या कल्याणासाठी माननीय पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्यक्रमाची माहिती देण्यात आली.

## उपदेशकथा विनम्र नेतृत्व

चंद्रावर पहिलं मानवी पाऊल ठेवणारा नील आर्मस्ट्राँग आपल्या सर्वांना माहीत आहे. त्याच्या या कर्तृत्वाबद्दल जगभरातून त्याचे अभिनंदन होत होते. एक अशक्यप्राय वाटणारी घटना सत्यात आल्याने त्या मोहिमेचा नेता नील आर्मस्ट्राँग खचितच कौतुकास पात्र होता. भारतातील डॉ. विक्रम साराभाई यांनी या यशास्विंतेबद्दल नील आर्मस्ट्राँगला विचारले 'इतकी मोठी सफलता तुम्ही कशी मिळवली?' नील आर्मस्ट्राँगने उत्तर दिले.' ही सफलता आमच्या अपोलो प्रोग्रॅमची आहे. आमच्या टीममधल्या प्रत्येकाला या मोहिमेचा उद्देश, कार्यपद्धती व अन्य बारीकसारीक तपशील माहीत होता. प्रत्येकाचे काम हे एका मोठ्या योजनेतील महत्वाचा दुवा आहे. याची जाणीव सर्वांना होती. माझ्या एका छोट्याशा चुकीमुळे संपूर्ण मोहीम अयशस्वी होईल हे सर्वांना समजले होते, म्हणून आमच्या अपोलो मोहिम`तील प्रत्येक घटकाने आपापले काम योग्य पद्धतीने केले आणि मोहीम यशस्वी झाली. सफलतेला साऱ्यांचे कष्ट कारणीभूत आहेत, मी तर केवळ निमित्तमात्र आहे. अभिनंदन सर्व चमूचे करायला हवे, माझ्या एकट्याने नव्हे!'

कथा उपदेश : विद्या हेच धन.

## काय बोलता राव ?

भाजपाचे नेते फोडाफोडीच्या राजकारणात, सत्ता हस्तगत करण्यात तरबेज असतात, तर मूळ राष्ट्रवादीचे शरद पवार आणि बंडखोर राष्ट्रवादीचे अजित पवार हे काट्याने काटा काढण्यात तरवेज आहेत. त्यामुळे कालच्या राज्य मंत्रिमंडळाबद्दल कोणी काही बोलले तरी त्यांचे आश्र्चर्य वाटण्याचे कारण काहीच नसावे त्यामुळे विनाकारण वावड्यानं महत्त्व देणे गरजेचे वाटत नाही.

**काय बोलता राव !**

अरे, सत्ताकारण्यासाठी सत्ता पदासाठी काही करून आपापल्या मनाजोगी करण्यासाठी जो कोणी विकसनशील लोकप्रतिनिधी लोकप्रिय आहे अशा आमदार, खासदार, मंत्र्यांना शांत करण्यासाठी काट्याने काटा काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अग्रेसर असते कारण मूळ राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार यांनी अनुसूचित जातीचे प्रतिनिधित्व करणारे प्राध्यापक लक्ष्मण ढोबळे यांच्या नकळत काटा काढला, आज ते घरबसल्या तमाशा पाहत आहेत. त्यानंतर या शरद पवार यांनी रामदास आठवले यांना उचलून नेले परंतु त्यांना शह देण्याचा प्रयत्न केला, परंतु रामदास आठवले यांनी काय आठवेल ते स्वीकारून आपापले सत्ताकारण केले आणि आता बंडखोर राष्ट्रवादी चे अजित पवार यांनी जुन्या जाणत्या कार्यक्षम सक्षम अशा छगन भुजबळ यांना वरचे आस दाखवून बाजूला सारले आणि न कळत त्यांचा काट्याने काटा काढला त्यातच नवखे असलेले परंतु सर्वांगीण विकास करीत करीत लोकप्रिय होऊ पाहणारे लातूरचे संजय बनसोडे यांना अलगद बाजूला केले. त्यामुळे भाजपा पुढे तर राष्ट्रवादीत काट्याने काटा काढण्यात तरबेज असते तू कशाला काळजी करतोस मैदानातच तमाशा बघत रहा चिंता करू नकोस तुला काय वाटते ते आपोआपच कळेल मग बोला दाजीबा!

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# सत्तेसाठी जातीय समीकरण !

## संपादकीय...

परवा महाराष्ट्र मंत्रिमंडळाचा शपथविधी संपन्न झाला मंत्रिमंडळ निर्माण करताना मंत्रिमंडळात सर्व जात धर्म आणि वर्णभेदावर केवळ सर्व जाती धर्माच्या आमदारांना शक्य त्या चौकटीत बसून जाती समीकरणाद्वारे मंत्रिमंडळ जाहीर करण्यात आले. मंत्रिमंडळातील सर्वच सदस्यांनी लोकशाही संविधानाची शपथ न घेता केवळ श्रीराम, जय शिवाजी, जय भवानी असे उद्गार काढून शपथविधी पार पडला त्यामुळे महाराष्ट्राच्या धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचाराला छेद दिला अशीच कुजबूज सर्वत्र होताना दिसते आहे.

राज्य मंत्रिमंडळाचा बहुचर्चित अवस्था रविवारी उपराजधानी नागपूर येथे पार पडला, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, सुधीर मुनगीटवार यासारख्या जुन्या अनुभवी सदस्यांना दूर ठेवून जे काही मंत्रिमंडळ भाजपा, शिंदे सेना आणि अजित पवार राष्ट्रवादीच्या नेत्यांनी जो काही जातीय समीकरणाचा आखाडा मंत्रिमंडळात निर्माण केला, ज्या अर्थी हिंदू, ओबीसी अल्पसंख्यांक, बिगर मराठा, मराठा अशा सर्व जाती-जातीचा समतोल राखण्यात आला. परंतु अनुसूचित जातीच्या जे कोणी आंबेडकरवादी आहेत, धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचाराचे आहेत, यांना संधी न देता हिंदुत्व नावावर शिवसैनिक बनलेल्या संजय शिरसाट यांना अनुसूचित जाती बौद्ध धर्माचे प्रतिनिधी म्हणून कोटा पूर्ण केला. परंतु वास्तवात धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचाराच्या आंबेडकरवादी बौद्ध धर्मातील संजय बनसोडे यांना दूर ठेवले परंतु त्यांच्या जागी अनुसूचित जातीतील दुसरा दिसला नाही का मग पुरोगामी धर्म निरपेक्ष विचाराच्या महाराष्ट्राचे काय, उद्याला फडणवीस सरकार हे महाराष्ट्र हिंदुत्ववादी करणार आहेत का, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या महाराष्ट्राचे काय असेच कुजबूज प्रसारमाध्यमातून होताना दिसते आहे.

मागील काँग्रेस असो की, आघाडी सरकार असो त्यांनी मराठा समाजाला प्रतिनिधित्व दिलच होते. परंतु ओबीसी, आदिवासी, भटक्या विमुक्त, असं अनुसूचित जातीला ही समतोल साधून प्रतिनिधित्व दिले जायचे परंतु आज घडीला युती सरकारमध्ये जे काही तीन गट सत्ताकारण करीत आहेत, त्यांचे प्रतिनिधित्व हे जातीयवादी असावे असे चित्र दिसते आहे, फडणवीस सरकार असो की मागील शिंदे, ठाकरे सरकार असो या सर्वांनी फुले, शाहू, आंबेडकर यांचाच उदो उदो केलेला आहे, विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नागपूर मध्ये गेल्यानंतर दीक्षाभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करूनच राजभवनात गेले आणि मंत्रिमंडळाचा विस्तार केला. परंतु महाराष्ट्राच्या धर्मनिरपेक्ष पुरोगामी भूमीत जातीयवादी हिंदुत्ववादी विचारांची पेरणी होत असेल तर ज्या महाराष्ट्राचा आदर्श इतिहास जगभरात आहे, तो कलंकित करण्याचाच प्रयत्न फडणवीस सरकार करणार आहे की काय, अशीही कुजबूज राजकीय वर्तुळात होताना दिसते आहे, कारण सत्तेसाठी सामाजिक न्याय, समानता, स्वातंत्र्य आणि हक्काच्या धोरणाला बाजूला ठेवून केवळ हिंदुत्ववादी विचाराचा थैयथयाट करून उदयाला महाराष्ट्राचे काय होणार असेही कुजबूज होताना दिसते आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी प्रादेशिक जातीय समतोल राखल्याचा कांगावा करून पश्रि्चम महाराष्ट्रातील १० मंत्री तर विदर्भात नऊ मंत्री दिले ठाणे कोकण मध्ये नऊ तर उत्तर महाराष्ट्रात सात मंत्रिपदे देऊन मराठवाड्याला सहा मंत्री देऊन मुंबईतील दोघांचा समावेश केला हा प्रादेशिक जातीय समतोल अनुसूचित जातीच्या लोकप्रतिनिधीवर अन्यायकार ठरवा अशी चर्चा राजकीय वर्तुळात होताना दिसते आहे, छगन भुजबळासारख्या ओबीसी नेत्यांना डावलून ओबीसींना भरभरून दिले असा कांगावा करणे म्हणजे अनुभवी व्यक्तींना विकासाची दृष्टी असलेल्या लोकप्रतिनिधीला बाजूला ठेवून रबरी शिक्का म्हणून कार्य करू पाहणारे लोकप्रतिनिधी मंत्रिमंडळात असतील तर सर्वांगीण विकास न्यायीक पर्याय कसे काय यशस्वी होतील मग आजूबाजूच्या मंत्र्यांना जवळ करून फडणवीस, शिंदे, पवार महाराष्ट्राला कोठे नेऊन ठेवणार आहे अशीही कुजबूज प्रसार माध्यमातून होताना दिसते आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार करताना सर्वांगीण विकास मतदारसंघातील समस्यांचे निराकरण करणारे लोकप्रतिनिधी सोडून मंत्रिमंडळात सामावून घेऊन महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकास आणि आर्थिक परिस्थितीला कोलदांडा घालून फडणवीस सरकार काय साध्य करू पाहत आहे, याचीच कूजबूज प्रशासकीय अधिकाऱ्यात होताना दिसते आहे.नागपूरच्या चालू अधिवेशनात पुरवणी मागण्याचा जो काही सपाटा चालू आहे आर्थिक तरतूद नसताना अर्थमंत्री पदाचे खाते आणखीन जाहीर झाले नसताना सामान्य प्रशासन विभागाचा प्रस्ताव नसतानाही ज्या काही पुरवण्या मागण्या मंजूर करण्यात येत आहेत, या बाबी सर्वसामान्य जनतेची फसवणूक करणारा बरेच काय अशीही संतापजनक चर्चा राजकीय वर्तुळात हाताला दिसते आहे. कारण पुरवणी मागण्याचा पाठपुरावा करून त्या मंजूर करून घेण्याचा हालचाली सुरू असताना बीड आणि परभणी येथे झालेल्या प्रकरणासंबंधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा उपमुख्य शिंदे यांनी आणि पवार यांना काही देणे घेणे नाही काय असेच चित्र समोर दिसते आहे ही बाब गंभीर असून अशा प्रकरणात तातडीने विनाविलंब कारवाई न करता स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनावर जबाबदारी टाकून फडणवीस सरकार कोणत्या विचारात मगणं आहे अशी ही उलट सुलट कुजबूज लोकांत दिसते आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक धोरणामध्ये कोणत्याही जाती धर्माला महत्त्व नाही. धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचाराचा पगडा असलेल्या महाराष्ट्रात फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारानुसारच समाजकारण, राजकारण, अर्थकारण सत्ताकारण चालत आलेलं आहे. परंतु भाजपा, सेना आणि काल-परवापासून अजित पवाराच्या राष्ट्रवादी गटाने हिंदुत्ववादी भूमिका घेऊन जे काही सत्तेत जे काही रणकंदन केले आहे हे घातकी वाटते कारण राष्ट्रवादीचे अजित पवार हे आणि धर्मनिरपेक्षता पुरोगामी विचार सोडलेले नाही, फुले शाहू आंबेडकर यांचा वारसा घेऊनच सत्ताकारण करीत आहोत परंतु जनतेच्या विकासासाठी म्हणून भाजपा सेनेबरोबर आहोत अशी बतावणी करतात मग मंत्रिमंडळ विस्तारित करताना पुरोगामी विचार कोठे झाकून ठेवून सामाजिक न्यायातून अनुसूचित जातीला प्रतिनिधित्व का दिलं नाही अशीही संताप जनक कुजबूज हिंदुत्ववादाची पेरणी करणाऱ्या फडणवीस सरकारने सत्तेसाठी हिंदुत्ववादी जातीय समीकरण स्वीकारावे आणि अजित पवार यांनी डोळे झाकून फडणीसाच्या गळ्याला गळा लावावा ही बाब राष्ट्रवादीच्या धोरणाला शोभते काय याची उलट सुलट प्रतिक्रिया प्रसारमाध्यमातून प्रकट होताना दिसते आहे.

## महिलांसाठी मोफत सिटी बस प्रवास योजनाद स्मार्टकार्ड नोंदणी केंद्रात बदल

लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने महिलांसाठी मोफत प्रवास बस योजना लातूर शहर बसमध्ये सध्या चालू आहे. शहर बस प्रवास करणाऱ्या महिलांचा प्रवास सुखकर व्हावा व त्यांना अधिकाअधिक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने लातूर शहर महानरपालिका,मार्फत महिला शहर बस पास (स्मार्ट कार्ड) योजना चालू करण्यात आली आहे. तरी सदर योजनेचा लाभ घेणेसाठी महानगरपालिका हद्दीमधील राहणाऱ्या महिलांनी आपल्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत व सोबत फॉर्म भरून गंजगोलाई शहर बस स्टॅाप, क्रिडा संकुल शहर बसस्टॅाप, लातूर शहर महानगरपालिका कार्यालय,लातूर, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक,लातूर,क्षेत्रीय कार्यालय सी, डाल्डा फॅक्ट्री लातूर, क्षेत्रीय कार्यालय अ ,मनपा कार्यालय लातूर, क्षेत्रीय कार्यालया ड गांधी चौक,लातूर येथे दिनांक १३/१२/२०२४ पासून रजिस्ट्रेशन चालू करण्यात आले होते.

परंतु महिला प्रवाशांची मागणी लक्षात घेता दिनांक १९/१२/२०२४ पासून खालील ठिकाणी सुधारीत बदल करण्यात आलेला आहे. संविधान चौक, पाण्याची टाकी, बार्शी रोड लातूर, जुना रेणापूर नाका शहर बस थांबा लातूर, गंजगोलाई शहर बस स्टॅाप, क्रिडा संकुल शहर बसस्टॅाप, लातूर शहर महानगरपालिका कार्यालय,लातूर, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक,लातूर, क्षेत्रीय कार्यालय सी, डाल्डा फॅक्ट्री लातूर येथे देऊन आपले फॉर्म भरून रजिस्ट्रेशन करून घ्यावे. त्यासाठी लातूर शहर हद्दीत राहणाऱ्या महिलांनी आपल्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत देऊन फॉर्म भरून आपल्या स्मार्ट कार्ड साठी महिला प्रवाशानी नजीकच्या केंद्रात जावून स्मार्ट कार्ड साठी नोंदणी करावी. याची शहर बस मधुन प्रवास करणाऱ्या लातूर शहर महानगरपालिका, लातूर हद्दीतील राहणाऱ्या सर्व महिलांनी नोंद घ्यावी.

## माता रमाई घरकुल योजनेतील थकीत हप्त्यासाठी मनपा आयुक्तांनी लावलेली सक्ती कर भरणा जाचक अट रद्द करा.

लातूर प्रतिनिधी, अनुसुचित जाती नवबौद्ध



घटकातील कच्चे घर असणाऱ्या नागरिकांचे पक्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे या उदार्थ हेतूने केंद्र शासन/महाराष्ट्र शासन समाज कल्याण विभागाकडून माता रमाई आंबेडकर आवास योजनेतून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून २०१२ पासुन सदरील योजना कार्यान्वित करण्यात आली या योजनेतून लातूर शहरात अंदाजे ३५०० लाभार्थ्यांना पक्या घराचा लाभ मिळाला आहे.प्रलंबित अर्ज मंजूरी करीता लातूर शहर महानगर पालिकेकडून १०० टक्के कर भरणा भरूनच अर्ज मंजूर केलेले आहेत.या मंजूर अर्ज लाभार्थीना अचार संहिता व विविध कारणाने घरकुल बांधकामाचे हप्ते प्रलंबित ठेवण्यात आले आहेत तेव्हा सदरीत थकित हप्ते तातडीने देण्यात यावे अशी मागणी जनहित सेवा युवा संघटनेच्या वतीने आज दिनांक १८ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजता जिल्हाधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे.

वर्तमान काळात सदरील योजनेतील प्रलंबीत हप्ते मिळावेत जेणे करून अर्धवट राहिलेले बांधकाम पुर्ण करण्या हेतून लाभार्थी लातूर शहर महानगर पालिकेत खेटे मारीत आहेत संबंधीत अधिकाऱ्या कडून चालू वर्षाचा कर भरणा व पुर्वी जल जीवन प्राधिकरण यांच्या कडे थकित मनमानी नागरीकांना आलेली पाणी पट्टी पुर्ण भरणा करण्याची जाचक अट लादली जात आहे. सदरील योजना स्थानिक स्वराज्य संस्थे मार्फत राबवली जात असतना कर भरणा सक्तीचा नसताना सुद्धा संबंधित आधिकाऱ्याकडून लाभार्थांना कर भरण्याची सक्ती/जाचक अट लादली जात आहे. माता रमाई घरकुल योजनेतील थकीत हप्त्यासाठी मनपा आयुक्तांनी लावलेली सक्ती कर भरणा जाचक अट रद्द करावी या उद्देशाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जनहित युवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांनी दिले निवेदन.

या निवेदनावर दिलेल्या अर्जानुसार तात्काळ कार्यवाही नाही झाल्यास येणाऱ्या पुढील काळात लोकशाही मार्गाने मोठे आंदोलन करण्यात येईल असे सांगण्यात आले.

# डॉ.बाबासाहेबांमुळेच जिवंतपणी सात जन्माचा स्वर्ग अनुभवला-डॉ.हुलगेश चलवादी

देशाच्या गृहमंत्र्यांनी आंबेडकरी अनुयायांची माफी मागावी



पुणे : देशातील सर्वसामान्यांना,गोरगरिब, शोषित, पीडितांना हक्क बहाल करणारे संविधान निर्माते परमपूज्य, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान आंबेडकरी अनुयायी कदापि सहन करणार नाही.बाबासाहेबांमुळे सर्वसामान्यांनी, शोषित, वंचितांनी जिवंतपणीच स्वर्ग अनुभवला. बाबासाहेबांचे नाव घेणे हि कुठली फॅशन नाही, तर ती आंबेडकरी अनुयायांची 'पॅशन' आहे.बाबासाहेब म्हणजे समता, बंधुता, सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, विचार अभिव्यक्ती, विश्र्वास, श्रद्धा , उपासनेचे स्वातंत्र, दर्जाची व संधीची समानता, राष्ट्रीय एकता आणि एकात्मता. त्यामुळे घटनाकार डॉ.बाबासाहेबांचा अपमान करणारे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देशवासीयांची आणि आंबेडकरी अनुयायांची माफी मागावी, अशी मागणी बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव आणि पश्रि्चम महाराष्ट्र मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी गुरुवारी (ता.१९) केली.

बाबासाहेबांनी तथागत गौतम बुद्धांच्या मार्गावर चालण्याची शिकवण अनुयायांना दिली आहे. बाबासाहेबांचे विचारच आमच्यासाठी स्वर्ग आहेत. बाबासाहेबांच्या दूरदृष्टिमुळेच लाखो कुळांचा उद्धार झाला आहे. देशाचा उद्धारकर्त्या महामानवाचा देशाच्या सर्वोच्च सभागृहात अपमान होणे ,हि बाब समस्त देशवासीयांची मान शरमेने खाली घालणारी आहे, अशी खंत डॉ. चलवादी यांनी व्यक्त केली. बसपा सुप्रीमो उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री सुश्री बहन मायावती जी यांनी देखील अमित शहा यांच्यासह राजकीय पक्षांकडून सुरु असलेल्या राजकारणावर भाष्य केले आहे.

भाजप, काँग्रेस आणि इतर पक्षांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव वापरून राजकीय पोळी शेकून न घेता त्यांचा आदर-सन्मान केला पाहिजे. या पक्षांचे दैवत कुणीही असले तरी त्यावर बसपाला कुठलाही आक्षेप नाही. परंतु, दलित तसेच इतर मागासवर्गीयांसाठी बाबासाहेबच एकमेव दैवत आहे. बाबासाहेबांमुळेच या वर्गांना ज्या दिवसापासून देशात संविधान लागू झाले त्या दिवसापासून सात जन्माचे स्वर्ग मिळाले. काँग्रेस, भाजप तसेच इतर पक्ष दलित तसेच इतर उपेक्षितांबद्दल दाखवत असलेले प्रेम हे दुट्टपी आहे. या पक्षांकडून या वर्गांचे हित जोपासना आणि कल्याण अशक्य आहे.

बहुजन समाज तसेच महान संत , गुरु ,महापुरुषांचा संपूर्ण आदर सन्मान केवळ बसपा सरकार मधेच मिळू शकेल, अशी बसप ची भूमिका असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले. फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्र कुठल्याही महापुरुषाचा, महामानवाचा अपमान शहरं करून घेणार नाही.त्यामुळे शहा यांच्या वक्तव्यामुळे आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावल्याने त्यांनी माफी मागावी, या मागणीचा पुनरूच्चार डॉ. चलवादी यांनी केला.

## लातूरसह राज्यातील कोलमडलेली स्वस्त धान्य यत्रणा सुरळीत करा

लातूर / प्रतिनिधी : लातूर ग्रामीण सह लातूर जिल्ह्यातील आणि राज्यातील अनेक भागात स्वस्त धान्य दुकानातील ई- पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने धान्य वितरण व्यवस्था पूर्णतः कोलमडली आहे. त्यामुळे राज्य शासनाने तातडीने या प्रश्र्नात लक्ष घालून धान्य वितरण यंत्रणा सुरळीत करावी, अशी मागणी मा. आमदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी केली.



गेल्या महिनाभरापासून स्वस्त धान्य दुकानातील ई- पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झालेला आहे. त्यामुळे धान्य असूनही त्याचे वितरण करता येत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. याचा प्रचंड मनस्ताप लातूर जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. याबाबत लातूर ग्रामीण मधून सर्वसामान्यांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. या पार्श्र्वभूमीवर मा. आमदार, काँग्रेसचे सरचिटणीस श्री धिरज विलासराव देशमुख यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे या विषयाकडे लक्ष वेधले.

लातूर ग्रामीण मधील रेणापूर, लातूर, औसा तालुक्यातील गावातून स्वस्त धान्य दुकानातील ई- पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड असल्याच्या तक्रारी येत आहेत. लातूर जिल्ह्यात आणि राज्यात गेल्या दोन - तीन आठवड्यापासून स्वस्त धान्य दुकानातील ई पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाला असल्याने धान्य वितरण ठप्प असल्याचे स्पष्टीकरण येथील शासकीय अधिकारी देत आहेत. त्यामुळे राज्यातील असंख्य नागरिक स्वस्त आणि मोफत धान्यांच्या प्रतीक्षेत असल्याने दिसत आहे. राज्य शासनाने तातडीने या प्रकरणात लक्ष घालून लातूर ग्रामीण आणि राज्यातील सर्व ठिकाणची धान्य वितरण यंत्रणा सुरळीत करून सामान्यांच्या दिलासा द्यावा अशी मागणी मा. आमदार, काँग्रेसचे सरचिटणीस श्री धिरज विलासराव देशमुख यांनी राज्य सरकारकडे केली.

## गोवा मुक्ती दिन

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र्य झाला. दीडशे वर्ष राज्य करून इंग्रज भारतातून निघून गेले. संपूर्ण देशात स्वातंत्र्याची पहाट उगवली पण भारतातील एक छोटेशे निसर्गरम्य बेट असलेले गोवा मात्र पारतंत्र्यातच होते. गोव्यावर पोर्तुगीजांची सत्ता होती. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोव्यात पाय ठेवला तेंव्हापासून गोमंतकीय जनतेचे नष्टचर्य सुरू झाले होते.

तब्बल साडेचारशे वर्ष पारतंत्र्यात राहिलेल्या गोव्याचे नष्टचर्य १९ डिसेंबर १९६१ रोजी संपले. १९६१ च्या युद्धानंतर भारतभूमीवरील उरलेसुरले पोर्तुगीज अधिपत्य समाप्त झाले, तसेच गोवा, दमन व दीव हा प्रदेश मुक्त झाला. कोकण पासून पेडणेपर्यंत पसरलेली गोव्याची निसर्गरम्य भूमी १९ डिसेंबर १९६१ रोजी भारताशी एकरुप झाली अर्थात १९६१ चे युद्ध हा गोवामुक्ती आंदोलनाचा निर्णायक भाग होता पण गोवा मुक्ती आंदोलनाला खूप मोठा इतिहास आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वातंत्र्य झाल्यानंतर देशातील ५६५ संस्थाने भारतात विलीन झाले पण पोर्तुगीजांनी गोवा, दीव, दमन, दादरा आणि नगरहवेली या आपल्या वसाहतीतुन जाण्यास स्पष्ट नकार दिला. ते गोव्याचे भारतात विलीनीकरण करण्याच्या बाजूने नव्हते.

पंतप्रधान पंडित नेहरु हे पोर्तुगीज वसाहतीशी चांगले संबंध प्रस्थापित करीत होते पण तेथील प्रशासक मात्र त्यांना सहकार्य करीत नव्हते. गोमंतकीय जनताही पोर्तुगीजांच्या अत्याचाराला कंटाळून भारतात विलीन होण्यासाठी भारत सरकारने सहकार्य करावे अशी मागणी करीत होते. पोर्तुगीज गोव्याला भारतात विलीन करण्याच्या विरोधात होते पण जनतेला मात्र भारतात विलीन व्हावे असे वाटत होते. गोमंतकीय जनतेची इच्छा ओळखून पंतप्रधान नेहरू यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या माध्यमातून पोर्तुगीजांवर दबाव आणला. शांततेच्या मार्गाने भारत सोडून जाण्याचा संदेश त्यांनी पोर्तुगीजांना दिला पण पोर्तुगीजांनी या संदेशाला जुमानले नाही. शांततेच्या मार्गाने पोर्तुगीज देश सोडून जात नाहीत, वाटाघाटी यशस्वी होत नाहीत हे लक्षात आल्यावर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी लष्कराला कारवाईचे आदेश दिले.

भारताने लष्करी कारवाई करू नये म्हणून पोर्तुगीजांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगीज सरकारची जुलूमशाही आणि आंदोलनाला मिळणारा जनतेचा तीव्र प्रतिसाद या पार्श्र्वभूमीवर नेहरुंनी १७ डिसेंबर १९६१ रोजी आंतरराष्ट्रीय दबावाला न जुमानता भारतीय सैन्य गोव्यात घुसवण्याचा निर्णय घेतला. भारतीय सैन्याने पोर्तुगिजांचा पूर्ण पाडाव करुन १९ डिसेंबर १९६१ रोजी गोव्यात तिरंगा फडकवला आणि गोवा मुक्त झाला. साडेचारशे वर्ष पारतंत्र्यात असणाऱ्या गोव्यात स्वातंत्र्याची पहाट उगवली. दीव, दमन आधीच मुक्त झाले होते. या तिघांना मिळून केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा दिला. नंतर १९६७ साली सार्वमताने गोवा घटक राज्य म्हणून घोषित झाले. पोर्तुगिजांच्या गुलामीतून मुक्त होऊन आज गोव्याला तब्बल ६३ वर्ष पूर्ण झाली. गोवा मुक्ती संग्रामाचे हे ६३ वे वर्ष आहे. यानिमित्ताने गोव्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. गोवामुक्ती दिनाच्या गोमंतकीय जनतेला मनापासून शुभेच्छा!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## लातूर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गुरुवारी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

लातूर:- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र मॉडेल करिअर सेंटर व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार १९ डिसेंबर,२०२४ रोजी सकाळी १० वाजता लातूर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या रोजगार मेळाव्यात रोजगार देणारे १४ पेक्षा जास्त आस्थापना, उद्योजक यांनी ४१० रिक्त पदे अधिसूचित केली आहेत.

यामध्ये पुणे येथील अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. यांनी ट्रेनी ८० जागा (पात्रता- आयटीआय सर्व ट्रेड , डिप्लोमा दहावी, बारावी, कोणतीही पदवी). पुणे येथील तिरूमला फॅसिलिटी ट्रेनी ५० जागा (पात्रता-आयटीआय सर्व ट्रेड), छत्रपती संभाजीनगर येथील निपुण स्किल्स , निपुण मल्टीसर्व्हिसेस, ट्रेनी ५० जागा (पात्रता- आयटीआय सर्व ट्रेड, डिप्लोमा दहावी, बारावी, कोणतीही पदवी), व्हेरॉक इंजिनिअरिंग प्रा. लि. ट्रेनी, ५० जागा(पात्रता-दहावी, बारावी आयटीआय सर्व ट्रेड), पुणे येथील दना आनंद इंडिया, महले आनंद इंडिया, गॅब्रिएल आनंद इंडिया यांनी ट्रेनी ३० जागा (पात्रता -आयटीआय सर्व ट्रेड), नांदेड येथील चैतन्य इंडिया फिन क्रेडिट प्रायव्हेट लिमिटेड यांनी कस्टमर रिलेशनशिप एक्झीक्युटिव्ह-२० जागा (पात्रता- दहावी, बारावी कोणतीही पदवी), लातूर येथील इंडोमोबील सर्व्हीसेस यांनी मेकॅनिक-१० जागा (पात्रता- आयटीआय मेकॅनिक), लातूर येथील वैभव इंडस्ट्री यांनी मशिनिस्ट, फिटर, ड्राफ्टमन, इलेक्ट्रीशन-१० जागा(पात्रता-संबंधित आयटीआय), इक्वीनॉक्स टेक्नोलॉजी यांनी टेक्नीशिअन, ऑफिसअसिस्टंट, अकाउटंट, वेल्डर-२५ जागा (पात्रता-आयटीआय वेल्डर, डिप्लोमा दहावी,बारावी, कॉमर्स पदवी, टॅली), सनसुर सृष्टी इंडिया प्रा. लि. यांनी असिटंट मॅनेजर, ब्रांच मॅनेजर, बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर-३० जागा (पात्रता- बारावी, कोणतीही पदवी) सुर्योदय स्मॉल फायनांन्स बँक यांनी रिलेशनशिप ऑफिसर, कलेक्शन ऑफिसर-२० जागा (पात्रता- बारावी, कोणतीही पदवी), नांदेड येथील शिवशक्ती ऍग्रीटेक लिमिटेड यांनी सेल्स ऑफिसर-२० जागा (पात्रता-दहावी, बारावी , कोणतीही पदवी), लातूर येथील क्रेडिट क्सीस ग्रामिण लि. यांनी रिलेशनशिप ऑफिसर-१० जागा (पात्रता- कोणतीही पदवी), लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी एलआसी ऍडवाझर-१५जागा (पात्रता- दहावी, बारावी, कोणतीही पदवी) तसेच जिल्ह्यातील इतर प्रमुख आस्थापनांनी रिक्त जागा अधिसूचित केल्या आहेत. यासाठी दहावी, बारावी, ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट, आय.टी.आय. सर्वट्रेड, डिप्लोमा तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

